30 JUN 2021 पुढारी


जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# माहितीची सत्यता पडताळणे महत्त्वाचे

## नुपूर सोनार; शिवाजी विद्यापीठात ऑनलाईन कार्यशाळा

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

कोव्हिडच्या साथीबरोबरच अपमाहितीचीही (फेक न्यूज) मोठी साथ आल्यासारखी परिस्थिती सध्या आहे. पारंपरिक प्रसारमाध्यमांसह समाजमाध्यमांमधून माहितीचा भडिमार सुरू आहे. त्यात खरी माहिती पडताळून पाहणे सामान्य नागरिकांसाठी अवघड झाले आहे. अशावेळी इंटरनेटचा वापर करून खरी व खोटी माहिती वेगळी करावी, असे आवाहन दिल्ली येथील गुगल न्यूज इन्शेटिव्हच्या प्रशिक्षक नुपूर सोनार यांनी केले.



विद्यापीठातून

शिवाजी विद्यापीठाचा पत्रकारिता व मास कम्युनिकेशन विभाग आणि कोल्हापूर प्रेस क्लब यांच्या संयुक्त विद्यमाने माहितीच्या सत्य पडताळणीविषयी दोन दिवसीय कार्यशाळेचे ऑनलाईन पद्धतीने आयोजन करण्यात आले आहे. नुपूर सोनार यांनी कार्यशाळेत बातमीतील तथ्य तपासणी आणि व्हेरिफिकेशन या विषयावर सादरीकरणासह मार्गदर्शन केले. यावेळी त्यांनी फॅक्ट-चेकिंग, वेबसाइट्स, गुगल रिव्हर्स इमेज चेक, व्हिडीओ आणि जिओलोकेशन व्हेरिफिकेशन आदी साधने वापरून माहितीची सत्यता कशी तपासावी, हे उदाहरणांसह दाखवून दिले.

विभागप्रमुख डॉ. निशा मुडे-पवार, कोल्हापूर प्रेस क्लबचे अध्यक्ष मोहन मेस्त्री यांनी कार्यक्रमाचे आयोजन केले. विभागाचे प्रा. डॉ. शिवाजी जाधव, डॉ. सुमेधा साळुंखे, सहयोगी प्राध्यापक चंद्रशेखर वानखेडे यांनी विशेष साहाय्य केले. विद्यार्थिनी वंदना रंगलानी यांनी आभार मानले. यावेळी डॉ. श्याम तारके, आर. विनायक, अश्विनी कांबळे, डॉ. राजेंद्र भस्मे, अनुराधा इनामदार, डॉ. सुनील राजपूत आदी उपस्थित होते. दरम्यान, बुधवारी (दि. ३०) कार्यशाळेच्या शेवटच्या दिवशी माहितीच्या सूत्रांची तथ्य पडताळणी, इंटरनेटचा प्रभावी वापर, फेसबुक, ट्विटर, यू ट्यूबवरील माहितीची पडताळणी व इतर विषयांवर मार्गदर्शन केले जाणार आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
3 0 JUN 2021
पुढारी

# कोरोनामुळे अनाथ झालेल्या विद्यार्थ्यांचे पूर्ण शुल्क माफ

**मुंबई :** कोरोनामुळे ज्यांच्या पालकांचा मृत्यू झाला आहे, अशा विद्यार्थ्यांचे पदवी-पदव्युत्तर शिक्षण पूर्ण होईपर्यंतचे संपूर्ण शुल्क माफ करण्यात आल्याची अशी घोषणा उच्च व तंत्रशिक्षण मंत्री उदय सामंत यांनी केली. विद्यापीठ आणि अनुदानित कॉलेजमधील विद्यार्थ्यांचे केवळ इतर शुल्क माफ करण्यात आल्याचेही ते म्हणाले. अनुदानित कॉलेज व विद्यापीठांकडून आकारण्यात येणाऱ्या इतर शुल्कांमधील जिमखाना शुल्क, विविध गुणदर्शन व उपक्रम शुल्क, कॉलेज मॅगेझिन शुल्क, संगणक शुल्क, क्रीडा निधी, वैद्यकीय मदत निधी आणि यूथ फेस्टिव्हल या बाबींसाठी आकारण्यात येणारे शुल्क पूर्णपणे माफ करण्यात येणार आहे.

3 0 JUN 2021

पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# पत्रकारितेतून गुन्हेगारीचे उदात्तीकरण नको

## पोलीस उपायुक्त मितेश घट्टे : शिवाजी विद्यापीठात ऑनलाईन व्याख्यान

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

पत्रकारितेला मोठी परंपरा आणि ऐतिहासिक वारसा आहे. पत्रकारितेच्या माध्यमातून गुन्हेगारीचे उदात्तीकरण होऊ नये, असे आवाहन पुण्याचे पोलीस उपायुक्त मितेश घट्टे यांनी केले. शिवाजी विद्यापीठाच्या पद्मश्री कै. डॉ. ग. गो. जाधव पत्रकारिता अध्यासनातर्फे आयोजित 'गुन्हेगारी बातम्या आणि पत्रकारांची जबाबदारी' विषयावर ते बोलत होते.

उपायुक्त घट्टे म्हणाले, पत्रकारांनी कायद्याचा अभ्यास केला पाहिजे. काळानुरूप गुन्ह्यांच्या स्वरूपात बदल होत आहे. या बदलांची नोंद पत्रकारांनी घ्यावी. निष्पक्ष, तटस्थ आणि जबाबदार पत्रकारिता समाजाला पुढे घेऊन जाते. पत्रकारांना माहिती मिळवण्यासाठी अनेक स्रोतांकडून माहिती घ्यावी लागते; परंतु ही माहिती वस्तुनिष्ठ आहे का, याचा विचारही पत्रकारांनी करायला हवा. पोलीस यंत्रणा पत्रकारांना अधिकृत



माहिती देतात. या माहितीवर पत्रकारांनी विश्वास ठेवावा.

सूत्रांची माहिती किंवा ऐकीव माहिती दिल्याने अनेक वेळा गोंधळाची परिस्थिती निर्माण होते. माहितीची खात्री होणार नसेल, तर अशी माहिती टाळणे योग्य ठरेल. घाईने माहिती देणे अंगलट येऊ शकते. कोणत्याही घटनेचा विविध अंगांनी परामर्श घेणेही गरजेचे आहे. सोशल मीडियाच्या माध्यमातून विकृती जन्माला येऊ पाहत आहे. अशा वेळी पत्रकारांबरोबरच पोलीस प्रशासनाचीही जबाबदारी वाढली आहे. पोलीस आणि पत्रकार यांनी एकत्र येऊन अशा अपप्रवृत्तींचा मुकाबला करणे आवश्यक आहे. पत्रकारितेच्या विद्यार्थ्यांनी भविष्यात गुन्हेविषयक पत्रकारिता करत असताना संवेदनशीलपणे प्रत्येक घटनेकडे पाहावे, असे आवाहन त्यांनी केले. समन्वयक डॉ. शिवाजी जाधव यांनी प्रास्ताविक केले. डॉ. सुमेधा साळुंखे यांनी आभार मानले.

3 0 JUN 2021

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# माध्यमांनी सत्यता पडताळणे आवश्यक

## नूपुर सोनार यांचे प्रतिपादन; मास कम्युनिकेशन, प्रेस क्लबतर्फे कार्यशाळा

कोल्हापूर, ता. २९ : इंटरनेटवरून माहितीचा भडिमार होत आहे. अशा काळात माध्यमांनी माहितीची सत्यता पडताळणे आवश्यक आहे; अन्यथा गैरसमज पसरतील. यासाठी विविध संकेतस्थळे, ॲप्लिकेशन उपलब्ध असून त्यांचा प्रभावी वापर केल्यास आपण खरे-खोटे करू शकतो, असे प्रतिपादन गुगल न्यूज इनिशिएटिव्हच्या प्रशिक्षक नूपुर सोनार यांनी केले. शिवाजी विद्यापीठाचा पत्रकारिता आणि मास कम्युनिकेशन विभाग आणि कोल्हापूर प्रेस क्लब यांच्या संयुक्त विद्यमाने या कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते.

सोनार म्हणाल्या, ''कोविडच्या महासाथीबरोबरच अपमाहितीचीही (फेक न्यूज) मोठी साथ आल्यासारखी स्थिती सध्या जाणवत आहे. पारंपरिक प्रसारमाध्यमांसह समाजमाध्यमांमधून आपल्यावर सतत माहितीचा भडिमार सुरू आहे. त्यात खरी माहिती पडताळून पाहणे सामान्य नागरिकांसाठी अवघड झाले आहे. अशा वेळी इंटरनेटचा वापर करून खरी आणि खोटी माहिती वेगळी करणे आवश्यक आहे. फॅक्ट-चेकिंग वेबसाइट्स, गुगल रिव्हर्स इमेज चेक, व्हिडिओ आणि जिओलोकेशन व्हेरिफिकेशन आदी साधने वापरून माहितीची सत्यता तपासता येऊ शकते. माध्यमात काम करणाऱ्यांनी याचा प्रभावी वापर केला पाहिजे.''

विभागप्रमुख डॉ. निशा मुडे-पवार आणि कोल्हापूर प्रेस क्लबचे अध्यक्ष मोहन मेस्त्री यांनी कार्यक्रमाचे आयोजन केले. प्रा. डॉ. शिवाजी जाधव, डॉ. सुमेधा साळुंखे आणि सहयोगी प्रा. चंद्रशेखर वानखेडे यांनी यासाठी विशेष साहाय्य केले.